आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३१ ऑगस्ट २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- SIR नंतर राज्याची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध, २ कोटी ८ लाखांहून अधिक नावं वगळली, ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार

- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के

- नेपाळमध्ये अडकलेल्या ४०६ नागरिकांशी राज्य सरकारचा संपर्क, अजूनही २०६ नागरिक नेपाळ-चीनमध्येच

**आणि**

- राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहायक प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाची मंजुरी

**<><><><><>**

SIR अर्थात विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अंतर्गत राज्यातल्या २८८ विधानसभा मतदार संघाच्या प्रारुप मतदार याद्या आज प्रसिद्ध झाल्या. त्यात २१ टक्क्याहून अधिक म्हणजेच २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - कॅप्सूल**

*(विशेष सखोल पुनरीक्षणाच्या नंतर राज्याच्या प्रारुप मतदार यादीत ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदारांचा समावेश आहे. मतदार यादीत नमूद ठिकाणी अनुपस्थित, स्थलांतर, मृत्यू, दुबार नोंदणी किंवा गणना पत्र भरायला नकार दिल्यामुळं २ कोटींहून अधिक मतदारांचा प्रारुप मतदार यादीत समावेश नाही. पुणे, ठाणे, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक या जिल्ह्यातून सर्वाधिक तर सिंधुदुर्ग, हिंगोली आणि गडचिरोलीतून सर्वात कमी मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत. सर्वाधिक २८ लाख ६६ हजारांहून अधिक मतदार पुण्यातले तर २८ लाख ५१ हजारांहून अधिक मतदार ठाणे जिल्ह्यातले आहेत. मुंबई उपनगरमधून २६ लाख ५८ हजारापेक्षा अधिक तर नागपुरातून १४ लाख ४३ हजारापेक्षा अधिक मतदारांची नावं प्रारुप मतदार यादीत नाही. सिंधुदुर्गमध्ये हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ८२ हजार ५१३ इतकं आहे. गडचिरोली, हिंगोलीच्या यादीतून १ लाखापेक्षा कमी मतदार वगळलेले आहेत.*

*मतदार यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना आजपासून ३० सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येतील. प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना किंवा १ ऑक्टोबरला १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या मतदारांना प्रपत्र ६ मध्ये घोषणापत्रासह भरावे लागेल. पडताळणीनंतर त्यांची नाव मतदार यादीत समाविष्ट होऊ शकतील. सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल. याविषयी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम म्हणाले*

*होल्ड - चोकलिंगम*

*या प्रक्रियेदरम्यान राज्यातल्या मतदान केंद्रांचंही सुसूत्रीकरण करण्यात आलं आहे. त्यानंतर एकूण ३७ मतदान केंद्र कमी झाली. मतदार कमी झाल्यानं हा बदल झाला आहे, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. याशिवाय १ हजार ४०३ मतदार केंद्रांचं ठिकाण बदलण्यात आलंय. प्रामुख्यानं मुंबई, ठाणे, पालघरमधली ही मतदान केंद्र आहेत.)*

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के होता. या कालावधीत देशात ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न ८१ लाख ३६ हजार कोटी रुपये होतं. या कालावधीत कृषी, पशुपालन, मासेमारी, खाणकाम यासारख्या क्षेत्रांची वाढ गेल्यावर्षीच्या ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्याच्या तुलनेत २ पूर्णांक ९ दशांश टक्के होती. उत्पादन, बांधकाम, वीज-गॅस-पाणी पुरवठा यासारख्या क्षेत्रांमध्ये ८ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ नोंदवली गेली. गेल्यावर्षी हा दर ६ पूर्णांक १ दशांश टक्के होता. व्यापार, हॉटेल, परिवहन, दळणवळण, वित्त, स्थावर मालमत्ता, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण यासारख्या क्षेत्रात गेल्यावर्षीच्या ८ टक्क्याच्या तुलनेत १० टक्के वाढ झाली.

देशाच्या अर्थव्यवस्थेनं साध्य केलेल्या या कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. पुरवठा साखळीतले अडथळे आणि जागतिक पातळीवरच्या अनिश्चिततेच्या काळात नागरिकांनी सामुहिक ताकदीच्या बळावरच हा दर साध्य केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

नेपाळमध्ये आलेल्या पुरानंतर मदत, बचाव आणि शोधकार्य आजही सुरू आहे. आतापर्यंत ९०३ जणांचे मृतदेह सापडले असून ४ हजारांपेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे.

दरम्यान, ४०३ भारतीय नागरिक चीनमधून सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले असून, ५०० भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडे आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या ४०६ नागरिकांची नोंद झाली आहे. त्यापैकी ३४२ जणांशी संपर्क झाला असून ६० जणांशी संपर्क करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्यातले २६२ नागरिक अजूनही नेपाळ आणि चीनमध्ये आहेत.

<><><><><>

राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहाय्यक प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाने मंजुरी दिली आहे, तसंच भरतीच्या वेळी मुलाखतीचं सीसीटीव्ही चित्रीकरण अनिवार्य करण्यात आलं आहे.उच्च आणि तंत्रशिक्षण विभागने आज त्याची अधिसूचना जारी केली.  विद्यार्थी पटसंख्या आणि कार्यभार यासंबंधी ऑक्टोबर २०२५मधे तयार केलेल्या समीकरणानुसार ही पदं मंजूर केली आहेत.

<><><><><>

रस्ते अपघातातले वाढते मृत्यू रोखण्यासाठी राज्यात अत्याधुनिक वाहतूक यंत्रणा उभारली जाणार असून त्यासाठी अडीचशे कोटींची तरतूद केल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ठाण्यात एका कार्यक्रमात ते बोलत होते.

<><><><><>

मागण्या पूर्ण झाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही आणि आंदोलनासाठी मुंबईला जाणारच, असा निर्धार मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा व्यक्त केला. मराठा आरक्षणाच्या मुख्य मागणीसाठी अंतरवाली सराटी इथे त्यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस होता. मराठा समाज बांधवांनी गनिमी काव्याचा वापर करून १२ तारखेपर्यंत मुंबईत दाखल व्हावं आणि निरोप मिळताच आंदोलनात सामील व्हावं, अशा सूचना त्यांनी केल्या.

जरांगे यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. त्यांच्याशी चर्चा करतानाच ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नसल्याचं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत दिलं. तर जरांगे यांना मुंबईत यायची गरज भासणार नाही, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं आमदार प्रसाद लाड म्हणाले.

मराठा आणि ओबीसी समाजामध्ये संघर्ष निर्माण करणारे मुद्दे पुढे करून राज्य सरकार जनतेच्या मूळ प्रश्नांपासून लक्ष विचलित करीत आहे, असा आरोप काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला. मराठा, धनगर, ओबीसी आणि आदिवासी समाजांमध्ये संघर्ष निर्माण करण्याऐवजी सरकारनं बेरोजगारी, रोजगार आणि विकासाच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावं , असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

फेक नरेटिव्हच्या माध्यमातून देशाची आणि राज्याची प्रतिमा खराब करायचा प्रयत्न सध्या सुरू आहे आणि त्याला वैचारिक पातळीवर चोख प्रत्युत्तर देण्याची गरज आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली. पुण्यात भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत ते बोलत होते. देश आत्मनिर्भरतेच्या दिशेनं वाटचाल करत असताना विकसित भारताची घोडदौड रोखण्यासाठी अनेक शक्ती प्रयत्नशील आहेत, राज्यघटनेचा गैरवापर करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेस नेते राहुल गांधी पुण्यात खोटं बोलले, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीनं साजरा व्हावा, असं त्यांनी सुचवलं.

**<><><><>**

५२ भटक्या विमुक्त समाजांना एकत्र आणून त्यांच्या हक्कासाठी देशव्यापी चळवळ उभारण्याकरता राज्यसरकार वचनबद्ध असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. भटके- विमुक्त दिनानिमित्त मुंबईत शिवसेनेतर्फे आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते. या समाजाला शिक्षण, उद्योग, नेतृत्व आणि विकासात वाटा

मिळाला पाहिजे याकरता प्रयत्न करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. तसंच लोककला, हस्तकला आणि पारंपरिक व्यवसायांचं जतन करण्यासाठी राज्यस्तरीय संमेलन भरवण्यात येईल असंही ते म्हणाले. शिवसेनेचे नेते, कार्यकर्ते ,पदाधिकारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसने ग्रामीण भागात संघटन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या गाभा समितीची बैठक आज मुंबईत राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांना समन्वयक नेमण्यात आलं असून येत्या २७ सप्टेंबरला नाशिक इथं राज्यव्यापी शिबिर आयोजित करणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**